Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

October-2022

(CCCLXXII) 372-A

## Maharashtra's Contribution to the Indian Freedom Struggle



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. M.N. Kolpuke
Principal
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga Dist. Latur

**Editor**
Dr. Subhash G. Benjalwar
Head, Department of History,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga Dist. Latur

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned by CamScanner

**Impact Factor-8.575 (SJIF)** **ISSN-2278-9308**

# B.Aadhar


## Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

October-2022

**(CCCLXXII) 372**

## Maharashtra's Contribution to the Indian Freedom Struggle



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social**
**Research & Development**
**Training Institute Amravati**

**Executive Editor**
**Dr. M.N. Kolpuke**
**Principal**
**Maharashtra Mahavidyalaya,**
**Nilanga Dist. Latur**

**Editor**
Dr. Subhash G. Benjalwar
**Head, Department of History,**
**Maharashtra Mahavidyalaya,**
**Nilanga Dist. Latur**

**This Journal is indexed in :**

- **Scientific Journal Impact Factor (SJIF)**
- **Cosmos Impact Factor (CIF)**
- **International Impact Factor Services (IIFS)**

**Aadhar International Publication**

***For Details Visit To : www.aadharsocial.com***

Scanned by CamScanner

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXII) 372 - A
ISSN : 2278-9308 October, 2022

## INDEX -A



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Role of Mahratta for Educating Masses in Indian National Movement **Dr. Geetali Tilak** | 1 |
| 2 | Mahatma Phule and Social Reforms with reference to Emancipation of Women **Dr. Nalini Avinash Waghmare** | 6 |
| 3 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये महाराष्ट्रातील डॉ. कमलाबाई अष्टपुत्रे यांचे योगदान डॉ. मेहेर ज्योती सांगळे | 11 |
| 4 | महाराष्ट्रातील स्त्रियांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान प्रा.डॉ. बाळू कांबळे | 16 |
| 5 | 'वंचितांच्या इतिहास लेखन परंपरेतून खानदेशातील भिल्ल आदिवासी स्वातंत्र्य सैनिकांच्या स्वातंत्र्य संग्रामाचा आढावा प्रा.डॉ. संजय जिभाऊ पाटील | 23 |
| 6 | महात्मा गांधी आणि हैदराबाद मुक्ती संग्राम प्रा. डॉ. जी. एस. पाटील | 28 |
| 7 | भारतीय क्रांतिकारी लढ्यामध्ये महिलांचे योगदान. प्रा.डॉ. विजया साखरे | 33 |
| 8 | १८७५ चा महाराष्ट्रातील शेतकरी दंगा: वसाहतवाद व शोषणवादी व्यवस्थे विरोधातील उठाव डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार | 37 |
| 9 | महाराष्ट्रातील क्रांतीकारी चळवळीचे भारतीय स्वातंत्र्य लढयातील योगदान **ढोणे सोनुताई हानवता** | 41 |
| 10 | आदिवासी शहीदवीर बिरसा मुंडा यांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान डॉ. नारायण सुदामराव गेडाम | 44 |
| 11 | महाराष्ट्रातील महिलांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान डॉ.सुचिता निवृत्तीराव किडीले | 48 |
| 12 | महाराष्ट्रातील आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक प्रा.मिलिंद व्यंकटी घाडगे | 54 |
| 13 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात औरंगाबाद जिल्ह्याचे योगदान पटेकर अर्जुन गंगाराम | 57 |
| 14 | सविनय कायदेभंगाच्या चळवळीतील महाराष्ट्र डॉ.शिवराम गोविंदराव जाधव | 60 |
| 15 | भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील रणरागिणी : लीलाताई पाटील प्रा.डॉ.गिरे संजय भाऊराव | 64 |
| 16 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात मराठी वृत्तपत्राची महत्वपूर्ण भूमिका : एक अभ्यास डॉ.गंगणे आर.व्हि. | 67 |
| 17 | कृषी प्रधान देशाच्या परिप्रेक्ष्यातून कृषी धोरणे एक आकलन प्राचार्य डॉ.बबन पवार | 70 |
| 18 | स्वातंत्र्योत्तर कालीन सामाजिक चळवळीची परिणामकारकता आणि वास्तव डॉ. रामभाऊ मुटकुळे | 73 |





Scanned by CamScanner

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXII) 372-A
ISSN : 2278-9308 October, 2022

# १८७५ चा महाराष्ट्रातील शेतकरी दंगा: वसाहतवाद व शोषणवादी व्यवस्थेविरोधातील उठाव

डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार
इतिहास विभाग प्रमुख, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा.

वसाहतवादी ब्रिटीश राजवटीचा परिणाम भारतातील विविध घटकांना सोसावा लागला, त्यापैकीच एक म्हणजे शेतकरी समूदाय होय. भारतीय इतिहास लेखन विशेष करून राजकीय घडामोडींवर केंद्रित झालेले असल्यामुळे शेतकरी समुदाय व त्यांच्या भूमिकांविषयी फारसे लेखन झाले नाही. परंतु ब्रिटीश काळात शेतकरी समुदायाने शोषणवादी व्यवस्थेच्या विरोधात घेतलेली भूमिका ही इतिहासलेखन प्रक्रियेत दखल घेण्यास भाग पाडणारी ठरते. विशेषत: महाराष्ट्रात ब्रिटीश सत्तेची स्थापना झाल्यानंतर प्रारंभीच्या काळात शेतकरी समुदायाने ब्रिटीश सरकारपुढे निर्माण केलेला प्रतिरोध राज्यकर्त्यांना दखल घेण्यास भाग पाडणारा होता. भारतामध्ये प्राचीन कालखंडापासून शेती हा प्रमुख व्यवसाय राहिलेला आहे. किंबहुना शेती हाच भारताचा प्रमुख व्यवसाय होता. या संदर्भात १९१८ च्या मोंटेग्यू चेम्सफोर्ड अहवालात 'भारतातील परिस्थिती' या संबंधीचा एक वैशिष्ट्यपूर्ण परिच्छेद दिला आहे. त्यात असे म्हटले आहे की, शेती हा लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. इंग्लंडसारख्या औद्योगिक विकास झालेल्या देशात १०० पैकी ५८ लोक उद्योगधंद्यात असतात. पण भारतात ७१ टक्के लोक शेतीवर असतात.'(रजनी पाम दत्त,:१९८) यावरून भारतीय लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच होता हे लक्षात येते.

परंतु असे असले तरी शेती या मुख्य व्यवसायाबरोबरच त्याला पूरक असे अनेक लघु उद्योगही भारतात होते. त्यामुळे शेतमालाच्या उत्पादनावर चालणारे अनेक विकसित असे उद्योग भारतात होते. यातून निर्माण झालेल्या वस्तू मोठ्या प्रमाणात युरोपात जात असत. भारतीय उद्योग व त्यातून निर्माण झालेल्या वस्तू या जगप्रसिद्ध होत्या. त्यामुळे भारतीय लोक मुख्य व्यवसाय असलेल्या शेतीवरच अवलंबून होते असे नाही. यासंबंधात रजनी पाम दत्त लिहितात, साम्राज्यशाहीच्या प्रचारातून भारताचे जे चित्र रंगविले जाते त्यात भारतीय जनता अडाणी व मागास असून १/४ भारतीय लोक शेतीवर जगतात असे सांगण्यात येते, पण ही धूळफेक आहे. निव्वळ शेतीवर जगणा-यांची वाढ ही ब्रिटीश राजवटीत होत गेली. याच साम्राज्यशाही राजवटीने मागील काळात शेती व उद्योगधंदे यावर समसमान जगणाऱ्या भारतीयांचे उद्योगधंदे नाश करून त्यांना संपूर्णपणे शेतीवर जगणे भाग पाडले. (रजनी पाम दत्त,:१९८) या आर्थिक जीवनशैलीतील बदलालाच शेतीचे व्यापारीकरण व भारतीय उद्योगांचा –ऱ्हास अर्थात निरुद्योगीकरण असे म्हटले जाते. या सर्व कारणांमुळे शेतकरी समुदाय हा शोषणवादी व्यवस्थेचा बळी ठरला. त्यातूनच शेतकरी समुदाय या शोषणवादी व्यवस्थेच्या विरोधात आवाज उठवण्यास प्रेरित झाला.

**शेतकरी उठावाची पार्श्वभूमी:**

शेतकरी समुदायाच्या उठाव करण्याच्या प्रेरणेमागे अनेक कारणे कारणीभूत होती. त्यात प्रामुख्याने वसाहतवादी व्यवस्थेने निर्माण केलेली शोषणवादी व्यवस्था जी भांडवलशाही व्यवस्थेशी जोडलेली होती. त्यातून भारतीय शेतकरी हवालदिल बनत गेला. 'वाढता जमीन महसूल, शेतक-यांच्यापाशी असलेला नगदि पैशाचा अभाव, शेतीचे व्यापारीकरण, सावकारशाही शोषणाचा अंमल यातून शेतक-यांचे दारिद्र्य वाढीस लागले.'(बगाडे उमेश:२०१७:०८) हेच दारिद्र्य शेतकरी समुदायास उठावाप्रत नेणारे ठरले. पेशवाईच्या पराभवानंतर एल्फिन्स्टनने महाराष्ट्रात रयतवारी जमीन महसूल पद्धती लावून शेतकऱ्यांना कंपनीचे खातेदार बनविले. दरवर्षी ठराविक सारा भरणे प्रत्येक शेतकऱ्याला बंधनकारक झाले. या रयतवारी पद्धतीत अनेक दोष होते. जसे की, जमिनीचे लहान तुकड्यात वाटणी, जबर खंड, वहिवाटीच्या हक्काची अनिश्चितता, जमिनीची अत्यल्प सुधारणा वगैरे म्हणून या सारा पद्धतीत सरकारने कालानुरूप बदल वा संशोधन करण्यासाठी तीन वेळा कमिशन नेमलेले दिसते. (मोरे दिनेश:२००६:४८२) तरीपण शेतकऱ्यांची दैन्यावस्था कमी होण्याएवजी वाढतच गेली. इ.स. १८७९ मध्ये डेक्कन एग्रीकल्चरीस्ट रिलीफ बिल मांडताना सर टी होप यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, 'रयतेच्या कर्जबाजारी अवस्थेला आपली महसूल पद्धत थोड्या प्रमाणात जबाबदार आहे ही गोष्ट प्रांजळपणे कबूल केली पाहिजे. (मोरे दिनेश:२००६:४८४) ही ब्रिटीश अधिकाऱ्यांनी व्यक्त केलेली भावनासुद्धा शेतकरी ब्रिटीशांच्या महसूल पद्धतीमुळे त्रस्त होता हे अधोरेखित होते. या सारापद्धतीत स्थानिक जमीनदार आणि सावकार हे ब्रिटीशांचे हस्तक होते, त्यांनीही शेतक-यांच्या शोषणात आणखी भर टाकली. त्यात नैसर्गिक आपत्ती आणि त्याचे सोयरसुतक नसलेले



Scanned by CamScanner

ISSN : 2278-9308
October, 2022

सरकार यामुळे दुष्काळजन्य स्थितीत शेतकरी समुदाय शोषणाला अधिक बळी पडला. 'महाराष्ट्रात दुष्काळाने १८७६ ते १८७८ अशी दोन वर्षे थैमान घातले होते. या दुष्काळात अन्नाचे व पाण्याचे दुर्भिक्ष आले. सोलापूर आणि विजापूर या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्राणहानी झाली. (मोरे दिनेश:२००६:४८२) त्यात भरीस भर ब्रिटीश सरकारने शेतसारा वाढवला. यामुळे शेतकरी अधिक कंगाल झाला. त्यात सावकारांच्या व्याजामुळे तर तो देशोधडीला लागला.

'१८७३ च्या जुलैमध्ये इंदापूर तालुक्यातील अडीच हजार सह्यांचा अर्ज गोपाळ नरसिंग देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मुंबई सरकारकडे पाठविल्याचा उल्लेख रवींद्रकुमार यांनी आपल्या वेस्टर्न इंडिया इन द नाईनटीथ सेंचुरी या ग्रंथात करताना म्हटले आहे की, आपले हक्क सावकारांनी व सरकारने हिरावून घेतल्याने आपली स्थिती भूदासासारखी झाली असल्याचे गाऱ्हाणे अर्जात मांडले (मोरे दिनेश:२००६:४८४). शेतकरी दुहेरी शोषणाच्या व्यवस्थेत पिळला जात होता, एकीकडे ब्रिटीश महसूल पद्धती तर दुसरीकडे सरंजामी, सावकारशाही यामुळे हे दुहेरी शोषण अधिकच बळकट होत चालले होते. शेतकरी कर्जाच्या बोजात गुंतत चालला होता. कर्जावरील चक्रवाढ व्याज, सावकाराची लबाडी, खर्चिक व दिरंगाईची न्यायव्यवस्था आणि सावकारशाहीला असलेला सरकारचा पाठिंबा यामुळे शेतकरी जमीन गमावू लागले. १८१८ मध्ये १५० एकर जमिनीचे मालक असलेले पारनेरचे देशमुख १८७५ पर्यंत कर्जबाजारी होऊन भूमिहीन बनले होते. पारनेर या छोट्याशा तालुक्याच्या ठिकाणी साधारणतः ५० च्या संख्येने असलेल्या सावकारांच्या आर्थिक सत्तेच्या ताबेदारीखाली तिथला शेतकरी अगदी पिचला जात होता. (बगाडे उमेश:२०१७:२२) या सर्व शोषणवादी व्यवस्थेच्या विरोधात व पर्यायाने ब्रिटीश सत्तेच्या विरोधात शेतकरी असंतुष्ट झाला आणि त्यातूनच १८७५ मध्ये महाराष्ट्रातील काही ठिकाणी शेतकरी समुदायाने सामुदायिक कृतीतून उठाव केला.

**१८७५ चा शेतकरी दंगा:**

१८७५ मध्ये पुणे, अहमदनगर व सातारा जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी घडलेले शेतकऱ्यांनी शोषणवादी व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सावकारांच्या विरोधात पवित्रा घेतला. या उठावापाठीमागे ब्रिटीशांची जाचक महसूल आकारणी, सावकारीचा पाश, अंतरराष्ट्रीय भांडवली व्यवस्थेत शेतकऱ्यांची होणारी लुट अशा अनेक कारणांनी शेतकरी जेरीस आला होता. (बगाडे उमेश:२०१७:२२) त्यातच आंतरराष्ट्रीय स्तरावर घडलेल्या राजकीय घटनांमुळे व्यापारिक स्थिती बदलली होती. १८६० च्या दशकात अमेरिकेत गृहयुद्ध उद्भवल्यामुळे कापूस निर्यात मोठ्या प्रमाणात वाढली. परिणामी कापसाच्या किमतीमध्ये वाढ झाली. पुढे १८६४ मध्ये हे अमेरिकेतील गृहयुद्ध संपुष्टात आले आणि कापसाच्या निर्यातीत मंदी आली. परिणामतः कापसाच्या किंमतीही एकाएकी कमी झाल्या. यामुळे आधीच शोषणवादी व्यवस्थेमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांवर मोठा परिणाम झाला. आणि याच काळात ब्रिटीश सरकारने महसुलात जवळपास ५० टक्के वाढ केली. (बिपिनचंद्र:२००६:२४) यामुळे आधीच आर्थिक कोंडीत सापडलेल्या शेतकरी समुदायाने ब्रिटीश वसाहतवादी व्यवस्थेच्या विरोधात आपला असंतोष व्यक्त करावयास सुरुवात केली. शेतकऱ्यांच्या या बंडाला तत्कालीन मुंबई इलाख्यातील दक्षिण भागात व्यापक प्रमाणात पाठिंबा मिळाला. पुणे, नगर, सोलापूर, नाशिक, खानदेश वगैरे जिल्हे उठावात सहभागी होते. या उठावाची व्याप्ती मर्यादित स्वरुपात असल्यामुळे त्यास 'दख्खनचे दंगे' अथवा 'डेक्कन रायटस' या नावाने ओळखले जाते. (मोरे दिनेश:२००६:४८७) हा उठाव विशेषकरून सावकारांच्या विरोधात होता, ते ब्रिटीश सत्तेच्या संरक्षणाखाली शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात शोषण करत होते. त्यातील बहुतेक सावकार हे गुजराती व मारवाडी होते, जे वेगवेगळ्या माध्यमातून शेतकऱ्यांचे शोषण करीत असत. त्यामुळे शेतकरी आणि सावकार यांच्यात नेहमी तणाव निर्माण होत असे. (बिपिनचंद्र:२००६:२४) त्यामुळे उठावामध्ये शेतकरी समुदायांना विशेषतः याच सावकारांना लक्ष केले होते.

हा उठाव ग्रामीण भागामध्ये हळूहळू सर्वदूर पसरत होता. शेतकऱ्यांनी ग्रामीण भागात आर्थिक सत्ता गाजवणाऱ्या मारवाडी सावकारांविरोधात सामुदायिकपणे व उत्स्फुर्तपणे हा उठाव केला होता. या उठावाचे वैशिष्ट्ये म्हणजे यामागील जाणीवा स्वयंप्रेरित होत्या. या उठावाच्या पाठीमागे कोणी विशेष नेता नव्हता तर हा उठाव सामुदायिक शोषणवादी व्यवस्थेच्या विरोधातील उठाव होता. त्यात असलेली शेतकरी समुदायाची स्वजाणीव ही महत्वाची होती. डिसेंबर १८७४ मध्ये शिरूर तालुक्यातील करदे गावापासून संघर्षाला सुरुवात झाली. कल्लुराम नावाच्या मारवाडी सावकाराने बाबासाहेब देशमुखांविरुद्ध फक्त १५० रु. कर्जासाठी न्यायालयातून आदेश मिळविला. त्याप्रमाणे सावकाराच्या माणसांनी देशमुखांचे घर पाडले तेंव्हा शेतकऱ्यांनी सावकारांच्या घरांवर व पेढ्यांवर हल्ले करून जाळपोळ केली आणि प्रत्यक्ष शेतकरी उठवला सुरुवात झाली. (ग्रोवर आणि बेल्हेकर:२०१३:४१५) शेतकऱ्यांनी उत्स्फुर्तपणे बंद केले. सावकाराच्या ताब्यातील शोषणाला कारणीभूत असलेल्या कर्जखतांची व संबंधित कागदपत्रांची त्यांनी जाहीर होळी केली. (बगाडे उमेश:२०१७:२२) शेतकऱ्यांचा या


Scanned by CamScanner

उठावावेळी मुख्य रोख सावकारांकडे गहान पडलेल्या गहानपत्रांकडे होता. ही गहानपत्रे अर्थातच सावकारांनी शेतक-यांना दिलेल्या कर्जाऊ रकमेपोटी ठेवलेली होती. अवाजवी कर्ज दरांमुळे ही गहानपत्रे सोडवून घेणे अशक्य बनत चाललेले होते. परिणामी शेतकऱ्यांच्या जमिनी व घरे सावकारांकडून जप्त केले जात होते, अर्थात सावकारांच्या या आर्थिक शक्तीला ब्रिटीश सत्तेचा पाठींबा होताच. त्यामुळे हा उठाव अप्रत्यक्षरित्या ब्रिटीश सत्तेच्याही विरोधातील होता.

करदे गावातील शेतकऱ्यांची प्रेरणा घेऊन आजूबाजूच्या अनेक गावांमधील शेतकरी उठावासाठी तयार झाले. तेंव्हा हा उठाव दडपण्यासाठी ब्रिटीश सरकारच्या जिल्हा मेजीस्ट्रेट पुण्याहून पायदळ व घोडेस्वार घेऊन तिथे आले. त्यांच्या प्रयत्नाने सात हजार रुपयांचा माल ज्याचा त्यास परत मिळाला. शंभराहून अधिक शेतकरी पकडून त्यांच्यावर दंड शेकावला, त्यांस शिक्षा झाल्या. (मोरे दिनेश:२००६:४८७) आता हा उठाव शेतकरी सावकार यांच्यापुरता मर्यादित राहिला नव्हता तर प्रत्यक्ष ब्रिटीश सरकारही सावकारांच्या बाजूने शेतकऱ्यांचा उठाव मोडीत काढण्यासाठी उतरले होते. त्यामुळे हा संघर्ष सावकार – सरकार विरुद्ध शेतकरी असा बनलेला होता. सरकारकडून दडपशाहीचे धोरण सुरु झाल्यानंतरही शेतकरी शांत झाले नाहीत. उलट उठावाचे लोन आणखी वाढत गेले. भीमथडी तालुक्यातील १७ गावे, शिरूर तालुक्यातील १० गावे, इंदापूर-हवेली येथील ३ गावे या उठवात सक्रीय होते. अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील ६ गावे, श्रीगोंदा तालुक्यातील ११ गावे, कर्जत तालुक्यातील एक गाव या उठावाने प्रभावित झाले होते. याशिवाय पुणे जिल्ह्यात २४ ठिकाणी सावकारांवर हल्ले करण्यात आले. (मोरे दिनेश:२००६:४८७) या उठावाच्या प्रत्येक ठिकाणी एक समान सूत्र होते ते म्हणजे सावकारांकडील कर्जरोखे, गहाण खते व इतर कागदपत्रे हिसकावून घेणे व ते नष्ट करणे. यासाठी मोठ्या प्रमाणात जाळपोळही करण्यात आली. यामुळे सावकार व सरकारी यंत्रणामध्ये एक प्रकारची भयभीत स्थिती निर्माण झाली. १८५७ च्या नंतर उद्भवलेल्या या स्थितीमुळे सरकारही गोंधळून गेले होते परंतु शेवटी जून १८७५ पर्यंत शेतकऱ्यांच्या या हालचालींवर नियंत्रण मिळवण्यात सरकारला यश मिळाले आणि हा उठाव ब्रिटीश सरकारच्या लष्करी सामर्थ्याने दडपून टाकण्यात आला.

शेतकरी समुदायाने या उठावाच्या वेळी आणखी एक सामुदायिक शस्त्राचा अवलंब केला, ते म्हणजे सामुदायिक सामाजिक बहिष्काराचे शस्त्र. सावकारांच्या जमिनी कसण्यास शेतक-यांनी नकार दिला. गावातील सर्व बलुतेदरानी सावकारांसाठी आपल्या सेवा बंद केल्या. सावकाराच्या घरी मयत झाल्यास कोणी खांदा देण्यास पुढे येईना. त्रासून गावातून निघून जाणाऱ्या सावकाराला बैलगाडी जुंपून देण्यासही कोणी येईना. एकसंघपणे, उत्स्फुर्तपणे व निर्धाराने शेतकरी लढत होते. शेवटी ब्रिटीश सरकारने बंड दडपण्यासाठी शक्ती पणाला लावली. घोडदळ पाठवून लढा चिरडण्यात अखेरीस त्यांना यश आले. (बगाडे उमेश:२०१७:२२) हा उठाव जरी प्रभावशाली स्वरूपाचा नसला तरी या उठावातून ग्रामीण शेतकरी समुदायातील एकसंघपणाची भावना विशेष उल्लेखनीय वाटते. सुमित सरकार यांच्या मते, या उठावात उठावकर्त्यांनी अमराठी असलेल्या सावकारांच्या विरोधात हा उठाव केला होता. स्थानिक सावकारांच्या विरोधात एकही उदाहरण या काळात दिसत नाही. (सरकार सुमित:२००६:६९) यापाठीमागे वसाहतीक शोषणवादी व्यवस्था हे प्रमुख कारण होते. वसाहतवादी व्यवस्थेच्या पाठबळावर या सावकार वर्गाने शेतकरी समुदायाचे अशा पद्धतीचे शोषण हेही लक्षात घेतले पाहिजे. त्यातूनच स्थानिक सावकारांच्या विरोधात हा उठाव का झाला नाही याचे स्पष्टीकरण मिळू शकते.

१८७५ च्या महाराष्ट्रातील शेतकरी समुदायाने केलेल्या उठावाचे रवींद्रकुमार यांनी उल्लेखिलेले वैशिष्ट्ये लक्षात घेतले पाहिजे ते म्हणजे या उठावात शोषणवादी व्यवस्थेचे प्रतिक असलेल्या सावकारांना सूड भावनेतून ठार मारण्यासारखे कृत्य शेतकरी समुदायाकडून घडलेले दिसत नाही. त्यांच्या मते, लुटालूट, जाळपोळ झाली असली तरी सावकारांना ठार मारण्यासारखे गंभीर गुन्हे फारच तुरळक प्रमाणात घडले असे या दंगलीची चौकशी करणाऱ्या समितीनेही कबूल केले आहे. शेतकऱ्यांनी सावकारांचे धान्य लुटले, घरांना आगी लावल्या व करारपत्रे जाळली; पण रक्तपात केला नाही. (मोरे दिनेश:२००६:४८७) यावरूनही शेतकरी समुदाय हा आर्थिक शोषणवादी व्यवस्था उलथवून टाकू इच्छित होता. यासाठी त्याचे प्रतिक असणारी गहाणपत्रे व कर्जरोखे नष्ट करण्याचाच प्रयत्न शेतकऱ्यांनी केला. याउलट कसल्याही प्रकारच्या हिंसक कृतीचा उल्लेख आढळत नाही. म्हणून त्यांचा हा उठाव वैधानिक अधिकारांच्या साठी झाला होता, असेही म्हणता येईल.

**निष्कर्ष:**

१८७५ चा उठाव हा प्रत्यक्ष ब्रिटीश सरकारच्या विरोधात नव्हता त्यामुळे सरकारच्या दृष्टीने तो फार गंभीर नव्हता. परंतु या उठावाच्या कारणांचा बारकाईने विचार करता, या पाठीमागे सरकारची महसूलविषयक धोरणेही कारणीभूत होतीच त्यामुळे सरकारला सावधपणे याविरोधात पवित्रा घ्यावा लागला. हा उठाव सरकारने आपल्या



Scanned by CamScanner

लष्करी बळावर मोडून काढला. विशेष बाब म्हणजे याची दखल सरकारला घ्यावी लागली आणि त्याच्या कारणांचा मागोवा घेण्यासाठी 'डेक्कन रीओटस कमिशन' सरकारला नियुक्त करावे लागले. यावरूनही या उठावाचे महत्व लक्षात येते. या उठावात शेतक-यांची सामुदायिक भावना विशेष काम करत होती त्यातून शेतकऱ्यांच्या एकसंघ वृत्तीचे दर्शन अर्थातच ब्रिटीश सत्तेच्या भवितव्याच्या दृष्टीने घातक होते. त्यामुळे ब्रिटीश सरकारला याकडे विशेष लक्ष द्यावे लागले हे विशेष. महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीच्या प्रेरणेतून झालेल्या शेतकरी उठावामध्येही पुढील कालखंडात हीच सामुदायिक भावना काम करताना दिसते किंबहुना भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महात्मा गांधीनीही शेतकरी समुदायाच्या याच सामुदायिक शक्तीला अधिक संघटीत करण्याचे काम केलेले दिसते. म्हणून शेतकरी उठावाची शोषणवादी व्यवस्थेला आव्हान देण्याची ही प्रेरणा स्वातंत्र्य लढ्याला निश्चितच प्रेरक ठरली असावी.

**संदर्भ ग्रंथ:**


१. बगाडे उमेश, वसाहतीक महाराष्ट्रातील समूहभान, हरिती पब्लिकेशन, पुणे, २०१७.

२. बिपीन चंद्र, भारत का स्वतंत्रता संघर्ष, हिंदी मध्यम कार्यान्विय निदेशालय,दिल्ली, २००६.

३. गेल ओम्वेत, वसाहतीक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५

४. ग्रोवर आणि बेलेकर, आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद पब्लिकेशन, दिल्ली,२०१३.

५. जावडेकर श.द. आधुनिक भारत, कोनटीनेन्तल प्रकाशन, पुणे,२००९.

६. मोरे दिनेश, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के.एस.पब्लिकेशन, पुणे, २००६.

७. रजनी पामदत्त, (अनु. देवधर) आजकालचा भारत,

८. सरकार सुमित, आधुनिक भारत, राजकमल प्रकाशन, दिल्ली,२००६

९. सव्यसाची भट्टाचार्य, आधुनिक भारत का आर्थिक इतिहास, राजकमल प्रकाशन, दिल्ली, २००७.

१०.हातेकर आणि पडवळ (संपा.), दोन जुने अभिज अर्थशास्त्रीय निबंध, लोकवांगमय गृह, मुंबई, २०१३.




Scanned by CamScanner